ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-I ISSUE-III AUG 2014

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

संत तुकाराम एक प्रयोगशील संत

प्रा. हजारे संदिपान निवृत्ती

मराठी विभाग

प.आप्पासाहेब पवार महाविद्यालय,बर्दापुर

ता. अंबाजोगाई जि. बीड

मराठी संत परंपरेमध्ये तुकारामांच्या अभंगाना अनन्यसाधारण महत्व आहे. संत परंपरेमध्ये जेवढे काही संत होवून गेले त्यामध्ये एक प्रयोगशील संत म्हणून आपण त्यांच्याकडे पाहू शकतो. तुकाराम बोल्होबा अंबिले (मोरे) हे मराठी सारस्वताला लागले गोड फळ आहे. गोडी किती गोड असून शकते याची प्रचिती समग्र जगाला त्यांनी करुन दिली. जीवनाच्या विविध पातळयांवर वावरत असताना संत तुकाराम महाराजांनी अनेक प्रयोग केलेले आपणास दिसून येतात. संत तुकारामांची अभंगरचना म्हणजे कविताच होय. तेंव्हा जो कवी स्वतःला नीटपणे व्यक्त करु शकतो तोच कवी त्याचे समकालीन भावजीवन प्रकट करु शकतो या दृष्टीने विचार करत असताना त्यानी तयार केलेले अभंग तयार केलेली कविता एकाच वेळी या दोन्ही गोष्टी करताना दिसतात. या दोन्ही किणाऱ्यावर सहजपणे वावरताना दिसतात. त्या कालखंडामध्ये जे प्रश्न तुकाराम महाराजांपुढे निर्माण झाले, जो त्रास त्याना झाला ती परस्थिती आजही आपणास पहावयास मिळले. मानवी मनाला स्थिर करण्यासाठी ते म्हणतात.

"पापाची वासना नको दावू डोळा !
त्याहुनि आंधळा बराच मी !! १ !!"

अशा विचाराची माणसे समाजात खूप कमी प्रमाणात दिसतात. डोळयाने दिसेल तेवढेच प्रमाण मानण्याची भुमिका ते आपल्या अभंगातून घेताना दिसतात. मानवी मनाच्या विविध भावछटा ते आपल्या अभंगरचनेतून व्यक्त करतात. जगात होणारा सगळा दुर्व्यवहार पाहून ते दुःखी होतात. त्याना असे वाटते की, संसारी माणसाकडून एखादी चूक घडली तर आपण समजू शकतो. परंतू अध्यात्माच्या क्षेत्रात होणारा दुर्व्यवहार बघून त्याना खूप वाईट वाटते. म्हणून त्यानी ढोंगी, दांभिक आणि बुवाबाजी करणाऱ्या तसेच भक्तीचे ढोंग करणाऱ्या लोकांवर सर्वाधिक फटके मारले आहेत. यावेळी त्यांची भाषा सडेतोड,, फटकळ आणि बरेचदा उपहासगर्भ होताना दिसते. त्यांच्या अभंग रचनेमध्ये एक श्रेष्ठ मुल्यात्मकता आहे. म्हणूनच भेदाभेदाचा भ्रम करणारे अमंगळ असतात असे तुकाराम महाराज स्पष्टपणे सांगतात. ते कुठेही तडजोड करत नाहीत.

ब्रहमज्ञान, शब्दज्ञान, पांडित्य, विद्वत्ता, उच्च वर्ण, यज्ञयाग, तांत्रिक विद्या याना ते ठाम नकार देतात. हे सगळ काही थोतांड आहे अस सांगायलाही ते कमी करत नाहीत. या सर्व गोष्ट वारकरी पंथाच्या तत्वज्ञानाच्याच. परंतू बहुजणांसाठी तुकारामांनी एक नवा मानव मुक्तीचा मार्ग स्विकारलेला दिसतो.

तुकाराम महाराजांच्या अभंगरचनेतून दिसून येणारी प्रयोगशिलता ही स्वाभाविकपणे येताना दिसते. म्हणून त्यातून येणारे शब्द शस्त्र होवून नेमकी मर्मस्थाने भेदतात, नेमक्या दंभावर आघात करताना

दिसतात. खळाळत वाहणाऱ्या पाण्याचा ओघ अडवूण गढूळ करणाऱ्या प्रवृत्तीच्या विरोधी संत तुकारामांनी पुकारलेले हे बंड आहे. त्यांच्या अभंगातून येणारी भाषा तिक्ष्ण आणि तिखट बनते. त्यांच्या अभंगाचे स्वरुप वैविध्यपुर्ण आहे. कर्तव्यकठोरता, जगजागृती, जनतेत परमेश्वर, सनातन विरोध, कर्मकांडाला विरोध, जातीयतेला विरोध, धर्म समानता, दांभिकाचा प्रखर विरोध, दृष्टांचे निर्दालन, मनोबलाचा विकास, विरतेची निर्मिती, पराक्रमाचा पुरस्कार, स्वाभिमानयुक्त जीवनादर्श, देशभक्ती राजनिष्ठा या सर्व गोष्टी त्यांच्या अभंगातून येताना दिसतात.
ज्या कालखंडामध्ये सनातन व्यवस्था खूप मोठया प्रमाणात जोर धरुन होती त्या कालखंडामध्ये तुकाराम महाराज म्हणतात.

"महारासि सिवे !
कोपे ब्राहमण तो नव्हे"

महारास शिवल्यास जो ब्राहमण कोपतो तो ब्राहमणच नाही. त्याने देहत्यागाचे प्रायश्चित केले पाहिजे. जो जाती मानतो, जो अस्पृशांना जवळ करत नाही त्याचे अंतरमन विटाळाने बरवटलेले असते. अशा प्रकारचा पुरोगामी वैचारिक बदल त्या कालखंडामध्ये सांगणे ही काही साधी गोष्ट नाही. ते फक्त विचार सांगत नसत तर स्वतः आचरणात आणत असत. भक्तीरस हा तर संत साहित्याचा आत्माच आहे. त्याला तुकाराम महाराजही अपवाद नाहित, वेळप्रसंगी श्रगांररसाचाही आश्रय ते घेताना दिसतात. विररसाचा परिपोष त्यांच्या काव्यातून होतो हे विशेष आहे. त्याचबरोबर,

'नवसे कन्या पुत्र होती
तरी का करणे लागे पती"

अशा प्रकारे अंधश्रध्देवर प्रहार करताना दिसतात. संत तुकारामांच्या अभंगामध्ये खूप श्रध्दा आहे पण ती अंध नाही तर ती डोळस आहे. अशा प्रकारे समस्त मानव जातीलाच डोळस करण्याचे महान कार्य त्यांनी अभंगरचनेतून केलेले आहे. आपल्या अभंगरचनेतून ते माणसाला माणसाच्या अस्तित्वाची जाणीव करुन देतात. चंदनाच्या जंगलामध्ये खूप साप असतात परंतू त्या सापांना चंदनाचा लाभ होत नाही. गाईच्या स्तनावर चिकटलेल्या गोचिडाला गाईच्या दुधाचा काहीही उपयोग होत नाही. त्याचा फायदा दुसऱ्यालाच होतो. उपदेश असा की ज्याची बुध्दी जड आहे. त्याला कधीच काही मिळणार नाही. एखादी गोष्ट तुम्हाला मिळवायची असेल तर त्यासाठी तुम्ही कष्ट केले पाहिजे, मेहनत घेतली पाहिजे. तुम्हाला कोणीही आयते बसून देणार नाही. एकंदरीत माणूस हा सतत आपल्या कामात व्यस्त असला पाहिजे. हा विचार तुकाराम महाराज त्या काळापासून सांगताना दिसतात. ही प्रयोगशील निर्मिती करत असताना तुकाराम महाराजांनी कधीही अडचण दाखवलेली नाही. वारकरी संपदायामध्ये सुरवातीपासूनच विविध जातीधर्मातील संत उदयास आले. आपल्या जन्मदत्त अडचणींवर तुकाराम महाराज स्वतःच्या सामर्थ्याने मात करतात. तुकाराम महाराज आणि बहुजन समाजातून आलेल्या इतर संत मंडळीमध्ये मोठा फरक जाणवते. तुकाराम महाराज कधीही आपल्या परिस्थितीचे भांडवल करत नाहीत. त्याचे अभंग भूतकाळ, वर्तमान काळ व भविष्य काळ यांचा वेध एकाच वेळी घेतात. वर्णव्यवस्थेचे चटके
त्यानाही सहन करावे लागले. इथली श्रेष्ठ - कनिष्ठत्वावर आधारित असणारी जाती व्यवस्था त्यांनी अनुभवलेली आहे.या व्यवस्थेमुळे त्यांचा छळही खूप झाला. 'रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग' ही उक्ती केवळ अध्यात्मिक संदर्भातच खरी नाही तर ती तुकारामांच्या जीवनात अधिक खरी आहे. एक साधाभोळा आणि प्रामाणिक माणूस एवढी उंची गाढतो ही गोष्ट थक्क करुन सोडणारी आहे. त्यांच जीवन म्हणजे सर्वांना सहजपणे वाचता येईल असं पुस्तक आहे. या समग्र अभंगरचनेमधून तुकाराम महाराजांची विविध रुपे आपणास पहावयास मिळतात. व्यक्तिगत तुकाराम, चिंतनाची उंची प्राप्त झालेले तुकाराम, दांभिकतेवर कोरडे ओढणारे तुकाराम, परमेश्वर रूपाचे - नामाचे माहम्य सांगणारे तुकाराम, विपरीत समाज स्थिती पाहून तळमळणारे तुकाराम अशा विविध रुपात ते व्यक्त होत असले तरी एक अखंड आणि अभंग व्यक्तिमत्व आहे हेही तितकेच खरे आहे.

आयुष्याची चाळीस ते एकेचाळीस वर्षे आयुष्य लाभलेल्या संत तुकाराम महाराजांनी आपले जीवन अनुभवसंपन्न करुन टाकले आहे. जगण्याच्या प्रत्येक वळणावर एक नवा आशवाद दिसतो. कर्मकांडावर प्रहार, सत्यनिष्ठा, तत्वनिष्ठा, जातीव्यवस्थेवर प्रहार, मानसिक विचार हे तुकारामांच्या अभंगरचनेमधून सतत वाहताना दिसतात. स्वतःशी सतत संवाद आणि त्यातुन आत्मपरीक्षण करीत राहणे ही तुकाराम महारांजाची स्थायी प्रवृत्ती आहे. त्यामुळेच आपण रात्रंदिवस युध्द करीत असतो ते म्हणतात. माणसाला स्वतःशी आणी इतरांशीही झगडावे लागते. आपल्यावर सतत अन्याय होत राहतात त्याच्या प्रतिकारार्थ पुष्कळ शक्ती खर्च होते असे सांगत असताना हे सर्व बळ मला भक्तीतून येते असे ते सांगतात.

खोटया आणि दांभिक प्रवृत्तीच्या लोकांवर तुकाराम महाराजांचा नेहमीच डोळा असतो. त्यांनी शाक्तांचा फार तिव्र निषेध केला आहे. स्वतःला मोठेपण मिळविण्यासाठी शिष्याचा मेळा जमवायचा, याती, ब्रहम कशाचीही पर्वा न करता वागायचे अशी त्यांची वर्तणूक असते. यावरही तुकाराम महाराज सडकून टिका करतात. जे सत्वशील असतील त्यांना काटयासारखे दूर करायची आणि ज्यांना काहीच कळत नाही अशांची संख्या वाढवायची. या गोष्टी आजही आपण समाजामध्ये घडताना पाहतो. कुठलाही राजकिय पक्ष घ्या! त्यामध्ये स्वार्थी कार्यकर्ते एवढे बोकळलेले असतात कि सच्चा कार्यकर्ता कुठेही दिसून येत नाही. आजच्या काळाचा वेध तुकारामांनी त्या काळामध्ये घेतलेला आहे. माणसांच्या अंतरंमनावर तुकाराम महाराजांचा अधिक विश्वास आहे. अंतरात्मा हाच अधिक, महत्वाचा असतो म्हणून अंतरंगी जे आहे ते प्रकट झालेच पाहिजे, नव्हे तो स्वभावच असतो असे तुकाराम महाराज सांगतात.चंदनाला आपला सुगंध कधीही दडवता येत नाही किंवा माझा सुगंध घ्या असेही त्यांला कधी म्हणावे लागत नाही. एवढया उंच पातळीवर तुकारामांचे अभंग जातात. ते म्हणंतात,

सुर्य नाही जागे करीत या जना !
प्रकाश किरणा कर म्हून !! २ !!
तुका म्हणे मेघ नाचती मयुरे !
लपविता खरे येत नाही !! ३ !!

याचा अर्थ असा की सूर्य लोकांना जागे करण्यासाठी उगवत नाही किंवा लोकांना त्याच्याकडे प्रकाश मागावा लागत नाही. सुगंध देणे हा जसा चंदनाचा स्थाईभाव आहे तसाच प्रकाश देणे हा सूर्याचा स्थायीभाव आहे. ढग आकाशात आले की मोर नृत्य करणारच. त्याना नृत्य करा असे सांगण्याची गरज पडत नाही.जो स्वभावधर्म आहे तो प्रकट होणारच ! मानवि मनाचे भावविश्वच ते उलगडून दाखवतात. अशा प्रकारे एका ना अनेक विषय त्यानी हाताळलेले पहावयास मिळतात. संत तुकाराम महाराजांनी बदल घडवत असताना माणूस हा केंद्रबिंदु मानलेला आहे. माणसाभोवतीच फिरणे हे जणू त्यांच्या अभंगाचे सूत्रच आहे. हे करत असताना चुकणा-याला चाप लावण्याचीही ताकत त्यांच्या अभंगामध्ये दिसून येते.विज्ञानवादी असलेले तुकाराम कधीही दैववादी होताना दिसन नाहीत. त्यांची अभंगरचना ही समाजामध्ये नवचेतना निर्माण करणारी आहे. ते स्वतःच जीवन तर अभंगामधून मांडतातच परंतु तुमचं जीवन कसं असावं! याचही मार्गदर्शन अभंगातून करतात. या दृष्टीने त्यांच्या अभंगाच्या पुढील दोन ओळी पाहू,

न कळे तत्वज्ञान मूढ माझी मती !
परि ध्यातो चित्ती चरण कमळ !! १ !!

आपल्या व्यक्तिमत्वातील विनम्र भाव ते प्रकट करतात. आपल्याला तत्वज्ञान काही कळत नाही, आपली मती मूढ आहे त्याचबरोबर आपणाला वेदही कळत नाहीत. हे ते सांगतात खरे परंतू भक्तीमार्गात या सगळयांची तशी काहीच आवश्यकता नाही ही आपली जमेची बाजूही सांगतात. आपणास हवे ते मिळत असेल तर नसत्या उचापाती माणसाने का कराव्यात असा स्पष्ट विचार ते या अभंगातून मांडतात. पुढे अशाच प्रकारचा विचार म.फुलेच्याही लिखाणातून आपणास दिसून येतो.

सत्याला प्रमाण मानून संत तुकाराम महाराजांनी सकळ जण शहाणे केलेले आहे.अनेक प्रयोग त्यांनी आपल्या अभंगामध्ये केलेले दिसून येतील. सत्य - असत्य, कसे ओळखायचे हे तुकारामांच्या अभंगाचे वाचन केल्याबरोबर लक्षात येते. त्यांची अभंगरचना येणाऱ्या संबंध पिढयांना मार्गदर्शक ठरणार आहे. यात कसलीही शंका नाही.

संदर्भ ग्रंथ

१ तुकारामांचे निवडक ७५ अभंग;संपा. डॉ. वासुदेव मुलाटे,के.एस.अतकरे, कैलास पब्लिकेशन औरंगपुरा, औरगांबाद १९९५

२.मध्ययुगीन मराठी वाङं; मयाचा इतिहास; प्रा. नरेंद्र मारवाडे के.एस.अतकरे प्रा.सुशिला सोलापुरे;कैलास पब्लिकेशन,औरंगपुरा,औरगांबाद १५ जुलै २००९